महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०२ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०११ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# विद्यार्थी हित पाहूनच त्रिभाषा सक्तीवर निर्णय - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** त्रिभाषा सक्तीबाबत राज्य सरकार कोणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, राज्यातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन निर्णय घेईल, असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केले. हिंदीला आमचा विरोध नसून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हिंदी भाषा सक्तीची केली होती, ती आम्ही ऐच्छिक ठेवली. त्रिभाषा सूत्राबाबत ज्येष्ठ अर्थतज्ञ व शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समितीचा अहवाल आल्यावर विद्यार्थी हित लक्षात घेऊन निर्णय घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



ठाकरे सरकारने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. त्या समितीमध्ये शिवसेना उपनेते विजय कदम यांचा समावेश होता. पहिली ते बारावीपर्यंत हिंदी भाषा सक्तीची असावी, असा समितीचा अहवाल ठाकरे सरकारने स्वीकारला. तरीही ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे घुमजाव केले आहे. काहींनी विरोध केल्याने आम्ही कोणताही अहंकार न ठेवता शासननिर्णय रद्द केला आणि समिती नियुक्ती केली आहे. पण आता कोणत्याही पक्षाचे हित न पाहता विद्यार्थी हिताचा निर्णय घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

निवडणुकीत जिंकता येत नाही, म्हणून काहीजण छोट्या-मोठ्या विजयाचा आनंद साजरा करीत आहेत. त्यांनी तो खुशाल साजरा करावा, अशी खोचक टिप्पणीही फडणवीस यांनी केली. दोन भावांनी एकत्र येवू नये, असा शासननिर्णय मी काढलेला नाही. मी शासननिर्णय रद्द केल्याने ते एकत्र येण्यास अडचण होईल, असे नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# विधानसभेत गदारोळ! नाना पटोले निलंबित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून आज विधानसभेत खडाजंगी झाली. लोणीकर आणि कृषीमंत्री राज्यातील शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात शेतकऱ्यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी केली. यादरम्यान, पटोले यांनी कथित असंसदीय भाषा वापरल्याचा मुद्दा उपस्थित करत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांना दिवसभरासाठी निलंबित केले.

पावसाळी अधिवशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी काँग्रेसचे आमदार नाना पटोले सभागृहात बोलण्यासाठी उभे राहिले. यावेळी ते म्हणाले, "लोणीकर आणि कृषीमंत्री कोकाटे शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. शेतकऱ्यांना हा अपमान सहन केला जाणार नाही. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही", असे पटोले म्हणाले. त्यांनी शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान होत असल्याने मुख्यमंत्र्यांनी माफी मागवी, अशी मागणी केली. त्यानंतर विरोधी बाकावरील आमदारांनी 'शेतकऱ्यांची माफी मागा' अशी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. यावेळी सभागृहात गोंधळ झाला. यावर अध्यक्षांनी पटोले यांना असंसदिय भाषा वापरणे योग्य नसल्याचे सांगत समज दिली. यावर पटोले थेट विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन जाब विचारू लागले. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, नाना पटोले विधानसभेचे अध्यक्ष असताना राजदंडाला स्पर्श केल्यानंतर यासंदर्भातील नियम तयार करण्यात आला होता. त्यामुळे सभागृहाचे पुढील कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यासाठी पटोले यांना दिवसभरासाठी निलंबित करत आहे.

थोडक्यात महत्वाचे

# वालधुनी नदीच्या मुद्द्यावर विधानसभेत लक्षवेधी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** प्रदुषणामुळे सांडपाण्याचा नाला झालेल्या अंबरनाथ आणि उल्हासनगर शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीच्या प्रदुषणाचा मुद्दा मंगळवारी पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेत उपस्थित करण्यात आला. शिवसेनेच्या आमदार मनिषा कार्यदे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. वालधुनी नदीची गटारगंगा झाली आहे. त्याच्या पुनरूज्जीवनासाठी ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे. मात्र तरीही त्यावर काही होत नसल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी आहे.

वालधुनी नदी ही अंबरनाथच्या टाहुली डोंगरात उगम पावते. याच नदीच्या प्रवाहावर सुमारे १ हजार वर्षांपूर्वी शिलाहार काळातील राजांनी शिव मंदिराची स्थापना केली. तेव्हापासून

आजतागायत हे मंदिर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरावरून शहराला अंबरनाथ नाव पडल्याचे बोलले जाते. पुढे याच नदीवर ब्रिटिशांनी ग्रेट इंडियन पेनिनसुला अर्थात जीआयपी धरण बांधले. त्याचा वापर बाटलीबंद पिण्याच्या पाण्यासाठी केला जातो.

प्राचीन काळापासून आतापर्यंत या नदीचे अस्तित्व अधोरेखीत झालेले असतानाही या नदीचे अस्तित्व मान्य करण्यात विविध प्रशासनानंनी वेळोवेळी नकार दिली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या नदीचा नाला म्हणून उल्लेख केला होता. तर अंबरनाथ नगरपालिकेनेही या नदीला नाला म्हटले होते. मात्र प्रदुषणामुळे या वालधुनी नदीची गटारगंगा झाली आहे.

अंबरनाथ शहरातील औद्योगिक वसाहत, एकेकाळी उल्हासनगर शहरातील जीन्स धुलाई कारखान्यांमुळे नदीच्या प्रदुषणात भर पडली. जीन्स धुलाई कारखाने बंद झाले असले तरी शहरातील औद्योगिक वसाहतींमुळे नदीत आजही पाणी सोडले जात अशल्याचा आरोप होतो. नागरी सांडपाणी सर्रासपणे आजही नदी मिसळले जाते आहे. याच मुद्द्यावर गेल्या अनेक दशकांपासून पर्यावरणप्रेमी झगडत आहेत. मात्र वालधुनी आणि शेजारच्या उल्हास नदी प्रदुषणावर ठोस काही झालेले नाही.

सोमवरापासून राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. या पावसाळी अधिवेशनच्या दुसऱ्या दिवशी विधान परिषदेत वालधुनी नदी प्रदुषणाचा मुद्दा शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनिषा कायंदे यांनी उपस्थित केला. कारखान्यांमधून प्रक्रिया न करता सोडले जाणारा रासायनिक सांडपाणी आणि त्यामुळे होणारे प्रदुषण यावर आमदार कायंदे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. यापूर्वीही वालधुनीच्या प्रदुषणाचा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला आहे. मात्र त्यावर ठोस काही झालेले नाही.

## आराखडाही रखडला आणि कृतीही

**उल्हास आणि वालधुनी नदीच्या प्रदुषणमुक्तीसाठी स्वतंत्र आणि सुधारित आराखडा तयार करण्यावर काही महिन्यांपूर्वी निर्णय झाला. पर्यावरण दिनी हा आराखडा घोषीत होण्याची आशा होती. मात्र त्यानंतरही त्यावर ठोस काही झाल्याचे दिसून आलेले नाही. प्रदुषण नियंत्रण मंडळाने नदीत मिसळणाऱ्या नाल्यांचे सर्वेक्षण केले. मात्र ते सांडपाणी रोखण्यासाठी निधी, इच्छाशक्ती आणि कृतीची गरज आहे.**

# शहाड उड्डाण पूल खड्डेमय करणाऱ्या अभियंता ज्योती शिंदेंवर कारवाईची मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शहाड उड्डाणं पूल खड्डेमय करणाऱ्या अभियंता जोती शिंदे यांची चौकशी करून कारवाई करा. शहाड कल्याण मुरबाड रस्त्या वरील शहाड येथील उड्डाणं पूल खड्डेमय झाले आहे. या खड्यामुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. भर पावसात या पुलावरील पक्के डांबरी काम उखडून काढून ठेकेदाराने या पुलाची वाताहत केली आहे. यास सर्वस्वी उप अभियंता ज्योती शिंदे जबाबदार आहेत. त्यांच्या या भ्रष्ट धोरणामुळे दोन वर्ष हा पूल बाराही महिने खड्डेमय असतो लाखो रुपये पुलाच्या दुरुस्ती साठी खर्च होतात. तेच ठेकेदार तेच अभियंता खड्डे मात्र तसेच त्यामुळे वाहन चालक नागरिक त्रस्त आहेत. पावसाळयात या खड्याचे स्वरूप,व प्रमाण भयानक वाढले आहे. तरी ही नॅशनल हायवे च्या अभियंता आपल्या नेहमी प्रमाणाच्या धोरणावर ठाम आहेत. खड्यामुळे पूल धोकादायक होतो आहे. भर पावसाळयात या पुलाची दुरुस्ती चा ठेका घेणाऱ्या ठेकेदार शांत आहे. पक्का रस्ता खराव केला आता खड्डेमय पुलावरील रस्ता वाहन चालकांची डोकेदुखी ठरत आहे. अशी स्थानिकांची तक्रार आहे

**1** **शहाड उड्डाणं पूल बाराही महिने खड्डेमय असते येथील राष्ट्रीय महामार्ग अभियंता फक्त डोळेझाक करत आहेत. आजच्या स्थितीत हा पूल खड्यानी पूर्णतः व्यापला आहे.**

■ सुधीर पालन्ड
स्थानिक रहिवाशी

**2** ■■■■■■■■■■■■

**राष्ट्रीय महामार्ग असताना या पुलाची दुरावस्था झाली आहे. लक्ष नसल्यागत हा पूल निकृष्ट कामामुळे आज खड्डेमय बनला आहे. यास येथील आभियंता व ठेकेदार जबाबदार आहे.**

■ राजन पाटील, वाहन चालक

# भाजप प्रदेशाध्यक्षपदी आमदार रवींद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची आज बिनविरोध निवड झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्र भाजपची जबाबदारी कोण घेणार याची सर्वांना उत्सुकता होती. त्यानंतर आज रवींद्र चव्हाण यांच्या नावावर घोषणा झाली आहे. रवींद्र चव्हाण हे आधीच महाराष्ट्र भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपदावर होते. त्यामुळे या पदासाठी ते योग्य व्यक्ती आहेत यावर भाजपमध्ये एकमत होते.

त्यानंतर प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीसाठी त्यांचे नाव दिल्लीला पाठवण्यात आले. या प्रक्रियेत इतर कोणत्याही नेत्याने अर्ज केला नाही, त्यामुळे आज रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. दरम्यान, रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे 12 वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.



**माझ्यासारख्या एका सामान्य कुटुंबातील व्यक्तीची महाराष्ट्र भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी निवड होणे, हे केवळ भारतीय जनता पक्षातच शक्य आहे**
**- प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण**

**"राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" या भाजपा मार्गावर सुरू असणाऱ्या वाटचालीत आज एक अत्यंत मौल्यवान जबाबदारी पक्षाने माझ्यावर सोपवली आहे, ती म्हणजे भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पद ! केंद्रीय निवडणूक अधिकारी व केंद्रीय मंत्री किरेनजी रिजिजू यांनी आज वरळीतील महाराष्ट्र राज्य परिषद अधिवेशनात याबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण घोषणा केली. त्यामुळे आजचा हा दिवस कधीही विसरता येणार नाही.**









# गीतासार



**अध्याय १५**

**पुरुषोत्तमयोगः**

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः । तमेव चाद्यम पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ १५-४ ॥

त्यानंतर त्या परमपदरूप परमेश्वराला चांगल्या प्रकारे शोधले पाहिजे. जेथे गेलेले पुरुष संसारात परत येत नाहीत आणि ज्या परमेश्वरापासून या प्राचीन संसारवृक्षाची प्रवृत्तिपरंपरा विस्तार पावली आहे, त्या आदिपुरुष नारायणाला मी शरण आहे, अशा दृढ निश्चयाने त्या परमेश्वराचे मनन आणि निदिध्यासन केले पाहिजे. ॥ १५-४ ॥

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः । द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ १५-५ ॥


ज्यांचे मान व मोह नष्ट झाले, ज्यांनी आसक्तिरूप दोष जिंकला, ज्यांची परमात्म्याच्या स्वरूपात नित्य स्थिती असते आणि ज्यांच्या कामना पूर्णपणे नाहीशा झाल्या आहेत, ते सुख-दुःख नावाच्या द्वंद्वापासून मुक्त झालेले ज्ञानीजन त्या अविनाशी परमपदाला पोचतात. ॥ १५-५ ॥

न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः । यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ १५-६ ॥

ज्या परमपदाला पोचल्यावर माणसे फिरून या संसारात येत नाहीत, त्या स्वयंप्रकाशी परमपदाला ना सूर्य प्रकाशित करू शकतो, ना चंद्र, ना अग्नी; तेच माझे परमधाम आहे. ॥ १५-६ ॥

## रेसिपी

### हैदराबादी आलू मेथी



साहित्य-

- कांदे- दोन
- कापलेले कीमा - ५०० ग्रॅम
- तेल- दोन चमचे
- लवंग- चार
- हिरवी वेलची- दोन
- आले लसूण पेस्ट- एक चमचा
- हळद- एक चमचा
- टोमॅटो- एक मोठी
- लाल मिरची पावडर-दोन चमचे
- मीठ- चवीनुसार
- हिरवी मिरची- तीन
- मेथीची पाने
- कसुरी मेथी- दोन चमचे
- बटाटे- तीन चौकोनी तुकडे केलेले

कृती-

सर्वात आधी कीमा धुवून त्यात बारीक चिरलेले कांदे घाला. पुन्हा चांगले धुवून एकत्र ठेवा. एका मोठ्या फ्राईंग पॅनमध्ये तेल गरम करा, नंतर त्यात लवंगा आणि वेलची घाला. नंतर आले लसूण पेस्ट, लाल मिरची पावडर, मीठ आणि हळद पावडर घाला. थोडा वेळ ढवळत त्यात चिरलेले टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नंतर कीमा आणि त्यात मिसळलेला कांदा घाला. कीमा मसाल्यांसह चांगले मिसळा आणि कीमा तपकिरी होईपर्यंत पॅन झाकून ठेवा. आता त्यात ताजी मेथीची पाने किंवा कसुरी मेथी मिसळा आणि वरून चिरलेले बटाटेही मिसळा. पॅनमध्ये थोडे पाणी मिसळा आणि झाकण ठेवा. आच मंद ठेवा. मध्येच ढवळत राहा. पाणी सुकले आणि बटाटे शिजले की, आच बंद करा. तर चला तयार आहे हैदराबादी कीमा आलू मेथी रेसिपी, आता पराठ्यांसोबत नक्कीच सर्व्ह करा.

# आमदार किसन कथोरेंच्या प्रयत्नाने शेतकऱ्यांना भात खरेदी व बोनसचे पैसे मिळणार - संतोष पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील सन 2020-21 मधील 551 शेतकऱ्यांचे खरेदी- विक्री संघाकडे खरेदी केलेल्या भाताचे बोनसचे पैसे अनेक वर्ष प्रलंबित होते.मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी शासनस्तरावर सतत याचा पाठपुरावा केल्याने येत्या दोन ते तीन दिवसात 500 शेतकऱ्यांचे 79 (एकोण ऐशी लाख रुपये) बोनस खात्यात जमा होणार असल्याची माहिती खरेदी विक्री संघाचे नवनियुक्त प्रशासकीय अध्यक्ष संतोष पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर मागिल संचालक मंडळाच्या चुकीच्या नोंदीमुळे उर्वरित 51 शेतकऱ्यांना बोनस मिळणार नसून ते वंचित राहणार असल्याचे सांगितले. त्याच बरोबर सन 2024 मधील खरेदी केलेल्या भाताचे 473 शेतकऱ्यांना पैसे मिळाले असून 141 शेतकरी शिल्लक आहेत. त्यांना सुद्धा लवकरच पैसे मिळणार असल्याची माहिती दिली.तसेच 2024 चा बोनस लवकर मिळण्यासाठी सुद्धा आमदार कथोरे साहेब प्रयत्नात आहेत. नविन प्रशासकीय संचालक मंडळ आल्यानंतर अगदी कमी दिवसात शेतकऱ्यांना खर्या अर्थाने न्याय मिळत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तर नविन संचालक मंडळाचे सदस्य तथा बाजार समितीचे मा. चेअरमन रमाकांत सासे यांनी मा.आमदार गोटिराम पवार यांनी खरेदी विक्री संघावर शासनाने नेमलेले संचालक मंडळ घटनाबाह्य आहे असे म्हटले होते यावर उत्तर देताना श्री सासे यांनी माजी आमदार पवार यांना लक्ष करत सहकाराचा दांटगा अनुभव असतानाही मागिल संचालक मंडलाच्या नाकर्तेपणामुळे निवडणुका होऊ शकल्या नसून मतदार याद्या या गटा नुसार बनवल्याचा ठपका सहाय्यक निबंधक यांनी दिलेल्या पत्रानुसार म्हटले आहे .म्हणजे निवडणुका न होण्यास मागिल संचालक मंडळ जबाबदार असल्याचे सासे यांनी म्हटले आहे.शिवाय संचालक मंडळाची मुदत 2021 मध्ये संपलेली असतानाही 2024 पर्यंत तीन वर्ष कारभार केला कसा असा प्रश्न यावेळी त्यांनी उपस्थित केला.जे मागिल संचालक मंडळांनी पंधरा वर्षात केले नाही ते आम्ही कथोरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली पंधरा दिवसात केले असल्याचा टोळा यावेळी लगावला.या पत्रकार परिषदेला संचालक चंद्रकांत बोस्टे, आण्णा शिंगोळे सुद्धा उपस्थित होते.

# खडवली रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकी स्वयंचलित जीने बसवण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत व मध्य रेल्वेच्या कसारा, आसनगाव रेल्वे मार्गावर असलेल्या खडवली रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकी व स्वयंचलित जिने बसवण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

भिवंडी, कल्याण तालुक्यातील पडघा, खडवली दुर्गम भागातील हजारो चाकरमानी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, रोजंदारी कामगार, महीला कामगार, दुकानदार, उद्योजक दररोज खडवली स्टेशनवरून रोजगार, शिक्षण, भाजीपाला विक्री, नोकरी उद्योगधंद्यानिमीत्त व विविध कामांसाठी मुंबई व उपनगरात जातात मात्र खडवली स्टेशनवर प्रवाशांना मिळणाऱ्या सुवीधा अपुऱ्या असुन प्रवाशांना नागरीकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे खडवली पुर्व व पश्चिमेला जोडणारा, तिकीट खिडकी व रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी असणारा रेल्वे पदचारी पुल खुप उचं असल्याने त्याच्या पायऱ्या चढून जाताना चाकरमानी, वृध्द, विद्यार्थी, महीला, नागरीक यांची दमछाक होत आहे. तर या रेल्वे पदचारी पुलाच्या पायऱ्यांचे अंतर सुध्दा उंच असल्याने पाय अडकुन अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तसेच हा रेल्वे पुल चढुन जाताना उशीर लागत असल्याने व तिकीट खिडकी एकाच ठिकाणी पुर्व बाजुला असल्याने तिकीट काढण्यासाठी वेळ जात असल्याने अनेकवेळा नागरीकांना लोकल चुकवावी लागत आहे. पडघा, खडवली परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असुन प्रवाशांची व खडवली रेल्वे स्थानकाजवळ बारमाही वाहणारी भातसा नदी असल्याने पंचक्रोशीतील, मुबंई व उपनगरातील पर्यटकांची संख्या सुध्दा वाढल्याने रेल्वे उत्पन्नातही वाढ झाली असुन स्थानकावर स्वयंचलित जिने व पश्चिम बाजूस तिकीट खिडकी वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# आपले सरकार मराठी माणसाकरता चांगले निर्णय घेते

**( आमदार भारत गोगावले यांचे वक्तव्य )**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : शिवसेना मेळाव्यात मार्गदर्शन करतांना आमदार भरत गोगावले यांनी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शक ठरली. शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपले सरकार मराठी माणसाकरता चांगले निर्णय घेत आहे.

आगामी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणूकिचकरिता आमचे सर्व आमदार, नेते, उपनेते, जिल्हाप्रमुख, महिला आघाडीप्रमुख, तालुकाप्रमुख, माजी नगरसेवक, शिवसैनिक यांचा मेळावा आयोजित केला होता. निवडणुकीत शिवसेनेची पुढील दिशा, महायुतीत निवडणुका लढावित असताना त्या त्या प्रभागातील जी जी परिस्थितिला समोरे जायचे कसे जायचे याकरिता डोंबिवलीतील होरायझन सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी गोगावले बोलत होते.

आगामी सार्वत्रिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, आमदार राजेश मोरे, बालाजी किणीकर, उपजिल्हाप्रमुख राजेश मोरे, कल्याण जिल्हा लोकसभा जिल्हा अध्यक्ष जितेन पाटील, तालुकाप्रमुख महेश पाटील, विधानसभा संघटक बंडू पाटील, महिला आघाडीप्रमुख लता पाटील, शहर संघटक शीतल लोके, कविता गावंड, शिल्पा मोरे यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# शहापूर येथील जि प शाळेतील बांधकाम शौचालयाचे अनावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता





**शहापूर ग्रामिण** : शहापूर ग्रामिण येथील जिल्हा परिषद शाळा, दोनघर या शाळेतील बांधकाम केलेल्या शौचालयाचे अनावरण करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ अमारा, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण व अशलॅन्ड कंपनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हे शौचालय बांधण्यात आले आहे. सदर, या बांधकाम केलेल्या शौचालयाचे अनावरण करण्यात आले आहे.

या कार्यक्रमावेळी पंचायत समिती शहापूर गट शिक्षणाधिकारी रामचंद्र विशे, अमारा क्लबच्या पदाधिकारी सुरेखा सदलापूरकर, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण पदाधिकारी बिजू उन्नीथान, अशलॅन्ड कंपनी पदाधिकारी रजनी भट, नडगाव केंद्रप्रमुख संगीता पवार, राहुल खिसतराव, भारती नाकवा, राजश्री आहेर, कैलास देशपांडे, धीरेंद्र प्रतापसिंग, सुजय परांजपे , विकास कातकीकर, प्रियांका विचारे, सुनील पाटील, भगवान खंडवी आदीजण उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवर यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शाळेसाठी पीओपी करून देऊन शाळेच्या भौतिक सुविधा जितक्या पूर्ण करता येतील त्या करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन क्लब व कंपनी पदाधिकारी यांनी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शिक्षक प्रदीप चव्हाण यांनी केले. तर शिक्षिका कविता भागवत यांनी आभार मानले.

# भिवंडी वाडा रस्त्यावरील बंद टोलनाक्याची दुरावस्था

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



## अपघात घडण्याची शक्यता

**भिवंडी** : या बीओटी तत्त्वावर विकसित केलेल्या रस्त्यावर सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी कडून टोल आकारणी केली जात होती. परंतु रस्त्याची निगा व दुरुस्ती न केल्याने नागरिकांच्या आक्रोशानंतर ११ ऑक्टोबर २०१९ मध्ये येथील टोल वसुली बंद करण्यात आली.परंतु त्या रस्त्यावर उभे असलेले टोल नाके सुद्धा आता खराब झालेल्या रस्त्याप्रमाणे जर्जर दुरावस्थेत आले असुन भयंकर अपघात होण्याची शक्यता आहे.

याबाबत पोलीस व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन तातडीने धोकादायक टोल नाके वरिल लोखंडी खांब व पत्रे काढून टाकावेत अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

भिवंडी वाडा या महामार्गावरील रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असुन दररोज अपघात व वाहतूक कोंडी चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या मार्गावरील कवाड गांवाजवळ रस्त्यांचे मधोमध पुर्वी येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनाकडून टोल वसुली साठी टोलनाका उभारण्यात आला होता.मात्र टोल वसुली बंद झाला आहे मात्र या टोल नाक्याचा लोखंडी सांगाडा तसाच उभा आहे. या टोलनाक्यावर मोठ्या प्रमाणावर झुडप वाढली आहेत.येथील विद्युत पुरवठा बंद असल्याने अनेक वेळा रात्री चालकांना या ठिकाणी अंदाज न आल्याने अपघात झाले आहेत.तर टोलनाक्यावरील छप्परावरील लोखंडी पत्रे सडल्याने अनेक पत्रे पडले आहेत तर अनेक पत्रे लटकत आहेत.पावसाळ्यात जोरदार वाऱ्याने हे पत्रे एखाद्या दुचाकी चालकावर पडल्यास एखाद्याला जीव गमवावा लागेल.पण याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात असुन सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन हा टोल नाका काढून टाकावा अशी मागणी होत आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक संघटनेने घेतली गटविकास व गटशिक्षणाधिकारी यांची भेट







दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : अखिल रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ व पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहून पेण पंचायत समिती गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच प्रमोद पाटील यांनी प्रभारी गटशिक्षण अधिकारी पेण म्हणून पदभार स्वीकारला आहे त्याबद्दल त्यांचेही संघटनेच्या माध्यमातून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच जगन्नाथ नारायण मोकल जिल्हा कोषाध्यक्ष यांना सेवानिवृत्त होऊन 9 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी संघटनेच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून ती सोडवण्यासाठी सहकार्य करण्याचे सांगितले

यावेळी अमरचंद पाटील जिल्हाध्यक्ष, प.जा.म्हात्रे. कार्याध्यक्ष गुरूनाथ पाटील जिल्हा सरचिटणीस, जगन्नाथ मोकल जिल्हा कोषाध्यक्ष,श्रीमती उत्तरा पाटील महिला प्रतिनिधी,राजाराम गावंड पेण तालुका अध्यक्ष, कोठेकर कार्याध्यक्ष, श्रीमती भारती म्हात्रे उपाध्यक्षा, श्रीमती सीमा सुर्वे उपाध्यक्षा, मुरलीधर म्हात्रे सरचिटणीस, श्रीमती अलका मोकल संयुक्त चिटणीस, श्रीमती आशा म्हात्रे संयुक्त चिटणीस, प्रदीप म्हात्रे तालुका कोषाध्यक्ष, मंगलदास ठाकूर सल्लागार, पांडुरंग म्हात्रे सल्लागार व इतर सदस्य हे सर्वजण उपस्थित होते.

# लोखंडी पाईप वाहतूक करणाऱ्या वाहनाची चारचाकी वाहनाला धडक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली** : कल्याण शीळ रोड टाटा नाका येथे सोमवारी 30 तारखेला सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास लोखडी पाईप वाहतूक करणाऱ्या वाहनाने चारचाकी वाहनाला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. धडक लागलेल्या चारचाकी वाहनामधील चालक व एक तरुण यांना सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. या अपघातात एका रिक्षाला पाठीमागून धडक लागली. रस्त्याच्या मधोमध हा अपघात झाल्याने काही वेळ वाहतूक व्यवस्था कोंडमडली होती. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस घटनास्थळी आले. वाहतूक व्यवस्था सूरळीत करून धडक देणाऱ्या वाहनाला बाजूला केले.

# हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी आज येथे विनम्र अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस श्री. पाटील यांच्यासह तहसिलदार रेवण लेंभे व जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी कर्मचाऱ्यांनीही पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्ताने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण

मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त

प्रवेश सुरू (२०२५•२६)

पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी

एम.ए (एमसीजे)

(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)

-पात्रता-

कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण

- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -

टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .

- प्रवेशासाठी संपर्क -

९४२१०५९३९६

goveli_jssp@rediffmail.com

www.jeevandeepcollegegoveli.in





जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित

जीवनदीप महाविद्यालय, गोवेली

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त

११ वी व १२ वी

कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)

UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.

POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography

Admission Open 2025-2026

आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज

आजच आपला प्रवेश निश्चित करा!

7775851123, 8108559566 9619188558








**मेष**

तुम्ही ऑफिसला लवकर जाण्याचा प्रयत्न कराल आणि तुम्हाला आवडेल ते काम कराल. पूर्वी गुंतवलेल्या पैशाचा फायदा तुम्हाला मिळू शकतो.

**वृषभ**

तुमच्या कामात कुटुंबाकडून सहकार्य मिळेल. तसेच, आज काही कौटुंबिक जबाबदाऱ्या तुमच्यावर सोपवण्यात येतील, ज्या तुम्ही पूर्ण कराल.

**मिथुन**

तुम्ही केलेल्या कामावर प्रत्येकजण खूश दिसतील. तुम्हाला खूप ताजेतवाने वाटेल, ज्यामुळे तुम्ही तुमची सर्व कामे वेळेवर पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क**

मित्रांच्या मदतीने तुम्हाला उत्पन्नाच्या संधी मिळतील, तुम्ही नफा मिळवाल आणि तुमची आर्थिक स्थिती मजबूत कराल. कामे वेळेवर पूर्ण करावी लागतील.

**सिंह**

वरिष्ठांकडून चांगली बातमी मिळेल. व्यवसाय करणारे लोक नवीन योजना राबवतील, जेणेकरून व्यवसाय पुढे जाईल. कुटुंबाकडून सहकार्य मिळेल.

**कन्या**

कुटुंबातील सर्व सदस्य मिळून एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देण्याची योजना आखतील. नोकरदार लोकांना त्यांच्या नोकरीत प्रगतीची संधी मिळेल.

**तूळ**

आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे, तुम्हाला शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य मिळेल.

**वृश्चिक**

तुम्ही सक्रिय राहाल आणि आरोग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल. कोणत्याही मदतीशिवाय पैसे कमवू शकाल, तुम्हाला फक्त स्वतःवर विश्वास ठेवण्याची गरज आहे.

**धनु**

मित्रांच्या मदतीने तुम्हाला नवीन संपर्क प्राप्त होतील. तुमचा व्यवसाय पुढे नेण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल.

**मकर**

आज तुम्हाला कुटुंबाकडून सहकार्य मिळेल. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र पार्टीत सामील होतील, जिथे इतर लोकांशी संवाद साधला जाईल.

**कुंभ**

एखाद्या खास व्यक्तीला भेटून तुमचे प्रलंबित काम पूर्ण होईल.तुमच्या क्षमता ओळखा कारण तुमच्यात ज्याची कमतरता आहे ती ताकद नसून इच्छाशक्ती आहे.

**मीन**

तुमचा मित्र तुम्हाला भेटायला येईल, जिच्यासोबत तुमच्या जुन्या आठवणी ताज्या होतील. विद्यार्थी पूर्ण एकाग्रतेने अभ्यास करताना दिसतील.

## गावराईपाडा रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात 'चक्का जाम' आंदोलनाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वसई (पूर्व) येथील गावराईपाडा व परिसरातील रस्त्यांची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असून वसई विरार शहर महानगरपालिका याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता गणेश पाटील यांनी प्रशासनाला थेट इशारा देत येत्या काही दिवसांत 'चक्का जाम' आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे.

तांडपाडा ते गावराईपाडा मुख्य रस्ता, मंगळ्या पाटील चौक, गावराईपाडा इंडस्ट्रियल नाका ते वर्धमान हा मार्ग औद्योगिक आणि रहिवासी दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा असून, दररोज हजारो नागरिक, कामगार व वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ होते. गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांनी रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करत असूनही, दरवेळी केवळ डागडुजी करून पालिकेने निधीचा अपव्यय केला आहे. या भागासाठी कॉंक्रीट रस्त्याचे लिखित आश्वासन दिले आहे, मात्र आजतागायत कोणतेही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. या संदर्भात जर प्रशासनाने १० दिवसांत रस्ता न बनविल्यास गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक नागरिक, व्यापारी, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक व सामाजिक संघटना एकत्र येत ११ जुलै रोजी मंगळ्या पाटील चौक गावराईपाडा मुख्य रस्ता येथे 'चक्का जाम' आंदोलन करणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला आहे.



## भिवंडी स्थानकात लोकलला उशीर : प्रवासी त्रस्त

### वेळापत्रक बिघडल्याने प्रवासी त्रस्त..



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** पनवेल येथून डहाणू ला जाणारी लोकल रेल्वे भिवंडी रेल्वे स्थानकावर रात्री एक तास उशिरा आल्यामुळे संतप्त झालेल्या प्रवासी नागरिकांनी रेल्वे (पटरी) रुळावर उतरून आंदोलन करून ही गाडी काही वेळ थांबवून ठेवली त्यामुळे तेथे मोठा गोंधळ निर्माण झाला होता अखेर रेल्वे पोलिस व रेल्वे प्रशासन अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन जमावाला शांत करीत सुमारे 30 मिनिटानंतर ही रेल्वे सुरळीतपणे डहाणूकडे रवाना झाली अचानक झालेल्या या गोंधळामुळे रेल्वेतील प्रवासी नागरिक हैराण झाले होते.

भिवंडीहुन दररोज शेकडो व्यवसायिक व नोकरदारवर्ग प्रवासी नागरिक वसई मार्गे मुंबई कडे प्रवास करीत असतात दिवा - वसई सोबतच पनवेल - डहाणू अशी लोकल या मार्गावरून दररोज धावत असतात त्यामुळे या रेल्वे स्थानकावर मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी असते.दिवसभर काम करून नोकरदार व व्यापारी रात्री घरी जात असतात मात्र लोकल रेल्वेला उशीर होत असल्यामुळे त्यांचे वेळापत्रक बिघडते त्यामुळे वैतागलेल्या अवस्थेत ते प्रवास करीत असतात. या मार्गावरून पनवेल - डहाणू ही लोकल दररोज रात्री 8:05 मी.भिवंडी रेल्वे स्थानकावर येत असते काल रात्री ही रेल्वे सुमारे एक तास उशीरा आल्याने रेल्वे ची वाट पाहणाऱ्या प्रवाशांचा राग अनावर झाला आणि त्यांनी निषेध व्यक्त करीत रेल्वे रूळावर उतरून रेल्वे सेवा अडवून धरली त्यामुळे घटनास्थळी गोधळ उडाला अखेर रेल्वे पोलीस व रेल्वे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन जमावाला शांत करून रेल्वे सेवा पुन्हा सुरळीत केली.

## ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने
# नव्वद टक्के अनुदानावर देण्यात येणाऱ्या तूर बियाणेचा प्रसार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने सेस अंतर्गत देण्यात येणारे९०टक्के तूर बियाणाची पत्रकार संजय कांबळे यांच्या कडून जोरदार प्रचार, प्रसार मोहीम राबविण्यात आली असून यामुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे.



जिल्हा परिषद सेस योजना कृषी निविष्ठांचा पुरवठा करणे अंतर्गत तब्बल९०टक्के अनुदानावर तूर बियाणे कल्याण पंचायत समिती येथे उपलब्ध झाले होते, या वाटपाचा शुभारंभ कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते झाला होता, यावेळी कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, पत्रकार संजय कांबळे, व तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते, हा लाभ तळागाळातील गरीब गरजू शेतकऱ्यांना मिळावा अशी अपेक्षा कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी व्यक्त केली होती. व तसे प्रयत्न करावेत अशी विंनती पत्रकार कांबळे यांना करण्यात आली होती, त्यानुसार त्यांनी याची प्रचार, प्रसार, प्रसिद्धी केली, इतकेच नव्हे तर ठाकूरपाडा येथील आदिवासी शेतकरी गणपत लुखा हिंदोळे यांच्या शेताच्या बांधावर जाऊन त्यांना तूर बियाणे दिले,

असेच बियाणे मांजर्ली चे शेतकरी बाबू गायकर, संजय घारे, नकलू घारे, वाघेरापाडा येथील तूकाराम हिंदोळे, इत्यादी शेतकऱ्यांना दिले,

या अगोदर देखील५०टक्के अनुदानावर आलेले भात बियाणे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना दिले, त्यांच्या या सहकार्याबदल ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, कल्याण पंचायत समितीचे कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, एस एस संत, आदींनी त्यांचे आभार मानून शुभेच्छा दिल्या.

## ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत
# कृषीदिन व शेतकरी सत्कार समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जिल्हा परिषद ठाणे व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिदिनाचे औचित्य साधून "कृषिदिन व शेतकरी सत्कार समारंभ" दि. 1 जुलै, 2025 रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



"केवळ पारंपारिक शेतीवर अवलंबून न राहता, शेतकऱ्यांनी जोडधंद्यांवर भर देणे काळाची गरज आहे. शेतीसोबत पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन यांसारखे पूरक व्यवसाय अवलंबल्यास आर्थिक स्थैर्य मिळते. उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवकल्पना, सेंद्रिय शेती, ठिंबक सिंचन यासारख्या पद्धती अंगीकारा. शेती हा व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज आहे. शेतकरी सक्षम झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल," असे मार्गदर्शन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटिल, निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे, कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. किर्ती डोईजोडे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर, लेखाधिकारी (२) रविंद्र सपकाळे, तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. जिल्हा कृषी अधिक्षक रामेश्वर पाचे यांनी प्रस्तावना सादर केली. यावेळी कृषी विभागाच्या विविध उपक्रमांवर आधारित घडी पत्रिका व पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात ठाणे जिल्ह्यातील प्रगतशील ३६ शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध कृषी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी माहितीपूर्ण सत्र घेतली. यामध्ये उदय देवळणकर (कृषी तज्ज्ञ), काशिनाथ गुणाखे (कृषीपूरक उद्योग), संजय कदम (उत्पादक कंपन्यांचे व्यवस्थापन), उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. वल्लभ जोशी (शेती व दुग्धव्यवसाय) यांनी आपले मार्गदर्शन दिले.

शेतकऱ्यांच्या मनोगतात गुरुनाथ सांबरे (कळवा), रामचंद्र आंबो पाटील (भिवंडी), आणि गजानन बापू उपसणे (शाहपूर) यांनी आपले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तरूलता धानके यांनी तर आभार प्रदर्शन कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



निष्ठावान भक्ताला परमेश्वराची म्हणजेच शाश्वत आनंदाची प्राप्ती होते, ती केवळ सदगुरुंमुळेच. त्यामुळे कितीही मोठा माणूस असला तरी त्याला मिळणारे ज्ञान, आत्मज्ञान या सर्वांच्या प्राप्तीसाठी सदगुरुंची आवश्यकता असतेच. म्हणतात ना,
गुरुविण कोण दाखवील वाट।
आयुष्याचा पथ हा दुर्गम, अवघड डोंगर घाट।।
गुरूमाऊली - प.पू.स. अलोकनाथजी महाराज

## आमदार शांताराम मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त
# मोफत महाआरोग्य शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार शांताराम मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित पडघा येथील मोफत महाआरोग्य सुपरस्पेशालिटी शिबीराला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, माणके कॅन्सर फाऊंडेशन, चिंतामणी हॉस्पिटल, माऊली सामाजिक विकास संस्था, पडघा डॉक्टर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पडघा ग्रामसचीवालय सभागृहात मंगळवारी चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक मयुर दुबेले, इरफान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत महाआरोग्य सुपरस्पेशालिटी शिबीर घेण्यात आले शिबीराची सुरुवात शिवसेना नेते प्रकाश पाटील व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते उद्घाटन करुन करण्यात आली. यावेळी चिंतामणी हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांकडून नागरीकांची कॅन्सर, किडनीचे आजार, दात, रक्त, ईसीजी, कॅन्सरसंबधी मेमोग्राफी, डोळे, जनरल तपासणी करून मोफत चष्मे, औषधे देण्यात आली.यावेळी ९८० नागरीकांनी शिबीराचा लाभ घेतला तर १६३ जणांना मोफत चष्मे देण्यात आले.तर यावेळी आमदार शांताराम मोरे शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णू चंदे, सरपंच रविंद्र विशे पडघा डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील युवा सेना तालुका प्रमुख अजय मोरे चिंतामणी हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर, नर्स टीम व विविध विभागाचे सहकारी उपस्थित होते.

# दुचाकी मालिकेच्या आकर्षक क्रमांकांसाठी अर्ज करा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** MH06CT या नवीन दुचाकी मालिकेची नोंदणी लवकरच सुरु होत असून, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण मार्फत आकर्षक व पसंतीच्या क्रमांकांसाठी आगाऊ अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यासोबतच या क्रमांकांसाठी लिलाव प्रक्रियेचेही वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.ज्या वाहनधारकांना चारचाकी खाजगी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक तिप्पट शुल्क (तीनपट विहित शुल्क) भरून हवे असतील, त्यांनी ३० जून २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यातील अर्ज, डिमांड ड्राफ्ट (DD), पत्ता पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्ड यासह साक्षांकित प्रतीसह कार्यालयात सादर कराव्यात.

एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी ३० जून रोजी सायंकाळी ४.०० वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल. या अर्जदारांनी १ जुलै २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत जास्तीची बोलीरक्कम डीडी स्वरुपात (किमान □३०१) बंद लिफाफ्यात जमा करणे आवश्यक आहे. लिलाव १ जुलै रोजी दुपारी ४.०० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात पार पडेल.दुचाकी वाहनांसाठी अर्ज प्रक्रिया चारचाकी वाहनांसाठी घेतलेल्या क्रमांकांव्यतिरीक्त राहिलेल्या आकर्षक क्रमांकांसाठी दुचाकी वाहनधारकांनी १ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज सादर करावेत. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास यादी २ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता लावण्यात येईल. त्यानंतर २ जुलै रोजी दुपारी २.३० वाजेपूर्वी इच्छित बोलीरक्कम (किमान □३०१) असलेला डीडी बंद लिफाफ्यात जमा करून दुपारी ४ वाजता लिलावात सहभागी होता येईल. डीडी Dy. RTO, Pen यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा व दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा.अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्डच्या साक्षांकित प्रती अनिवार्य.

## पेण आर.टी.ओ.चे आवाहन

लिलावासाठी फक्त एकच डीडी सील बंद पाकिटात जमा करावा.

जुन्या मालिकेतील सर्व क्रमांक संपल्याशिवाय नवीन मालिका सुरू केली जाणार नाही.राखीव क्रमांक नोंदणीनंतर १८० दिवसांत वापरला गेला नाही तर तो रद्द समजला जाईल.

विहित फी परत दिली जाणार नाही किंवा अन्य ठिकाणी समायोजित केली जाणार नाही.

### नवीन दुचाकी मालिकेचे वेळापत्रक पुढील प्रमाणे

३० जून, चारचाकी वाहनांसाठी तिप्पट शुल्काचे अर्ज स्वीकारणे .

१ जुलै, चारचाकी अर्जांचा लिलाव व दुचाकीसाठी अर्ज स्वीकारणे

२ जुलै, दुचाकी अर्जांचा लिलाव गाडीचा पसंतीचा नंबर राखून ठेवायचा असेल, तर दिलेल्या वेळापत्रकानुसार अर्ज सादर करून संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण, महेश देवकाते यांनी केले आहे.

## अबिटघर ग्रामपंचायत
# आयएसओ मानांकनाने प्रमाणीत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद :** आबिटघर या ग्रामपंचायतीला आंतरराष्ट्रीय मानकीकरण संघटन (आयएसओ) या मानांकनाने प्रमाणीत करण्यात आले आहे.

आबिटघर या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध सर्वांगीण विकासात्मक कामांना प्राधान्य देण्यात बरोबर येथील समाजपयोगी व लोकोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे कार्यरत ग्रामपंचायत समिती व व्यवस्थापन यांच्या प्रयत्नाने ग्रामपंचायतीने आयएसओ हा मानांकन मिळवून लौकिक मिळवला आहे.

ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे, उपसरपंच सुप्रिया पाटील, सदस्य भरत जाधव, कुलदीप पाटील, धनश्री पाटील, भावना रायात, कल्याणी साठे, मनिषा मुकणे, निखिल पाटील, स्मिता चिमडा, कल्पेश आमले तर ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील व कर्मचारी वर्ग यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नशीलपणाने व ग्रामस्थांच्या सहकार्याने ग्रामपंचायतीला हा दर्जा मिळाला असल्याचा विश्वास नागरीकांमधून व्यक्त केला जात आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

## कल्याण पश्चिममध्ये
# पाईपद्वारे गॅस वितरण सुरु

### माजी नगरसेविका विणा जाधव यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवसेना प्रभाग क्रमांक 38रामबाग सिंडीकेट प्रभागातील माजी नगरसेविका विणा जाधव यांच्या प्रयत्नाने कल्याण पश्चिम रामबाग सिंडीकेट परिसरातील आलिशान एन एक्स, रिध्दी सिध्दी, स्वरांजली, श्री गणेश टॉवर आदी सोसायटीच्या सदनिकांना घरगुती महानगर गॅस पाईप लाईन देण्यात आली असून त्याचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विणा जाधव यांनी निवडणुकीत दिलेल्या वचनाची वचनपूर्ती केली आहे.



यावेळी माजी नगरसेवक गणेश जाधव यांनी सांगितले की गॅस सिलेंडर घेण्यासाठी ऑनलाईन नंबर लावावा लागतो, तसेच वेळेवर गॅस बाटला मिळत नाही. यासाठी कल्याण पश्चिम रामबाग परिसरात पाईप द्वारे गॅस लाईन घरोघरी सदनिकांना देण्या बाबत सातत्याने पाठपुरावा सुरु होता. याबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व महानगर गॅस अधिकारी यांची बैठक घेतली. यासाठी खासदारांनी मोलाचे सहकार्य केले, निवडणूकीत दिलेल्या वचनाची वचनपूर्ती केली असल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाला माजी नगरसेविका विणा जाधव, युवासेनेचे उपशहर अधिकारी श्रेयस जाधव, विभाग प्रमुख संजोग गायकवाड, शाखाप्रमुख अभय कामत्य, उपशाखा प्रमुख दिपक तांबे, दिपक दुसाने, नरेंद्र नागरे, वेणू शेट्टी, राकेश तिवारी, किशोर दिवटे, अनिल गाजरे, प्रकाश गवाणकर, मिलिंद कुळकर्णी, हेमंत विंचूरकर, सुधीर कुळकर्णी, प्रकाश खैरनार, सतीश सावंत, शशिकांत चांदेकर, रमेश कळमकर, दिलीप कडैकर, मोहीत झोझवाला, हिरमेठ, अँथनी चेमेस्ट, प्रतिक दगडे, किरण पाटील, तसेच महिला आघाडीच्या उज्वला कामत्य, मीना बोपटे, सविता तांबे, शोभा बोडै, प्रिया खापरे, वैशाली चौधरी, धनश्री मगर, विजया दुसाने, साक्षी शिंदे, नुतन टेमघरे, आशा घरदाळे, नलिनी घरदाळे, वर्षा ठोंबरे, लिना बागल आदी उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024